आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
१३ ऑगस्ट २०२६ - गुरूवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- संसदेचं कामकाज संस्थगित

- खाणी आणि खनिजे विकास आणि नियमन सुधारणा विधेयक, राज्यसभेत मंजूर

- राष्ट्रपतींच्या हस्ते २०२४-२५ च्या संगीत नाटक अकादमी पुरस्कारांचं वितरण

**आणि**

- मणिपूरमधे गेल्या २४ तासात मोठ्या प्रमाणात अतिरेक्यांची धरपकड, अमली पदार्थ तसंच शस्त्रसाठा जप्त

**<><><><><>**

संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आजच्या शेवटच्या दिवशी दोन्ही सभागृहांचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेत सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा सभापती ओम बिरला यांनी सर्व सदस्यांना राष्ट्रीय गीत वंदे मातरम् च्या सन्मानार्थ उभं राहायला सांगितलं. वंदे मातरम गायनानंतर त्यांनी सभागृहाचं कामकाज अनिश्चित काळासाठी तहकूब केलं. यावेळी सभागृहात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा, विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि विविध पक्षांचे प्रमुख नेते तसंच सदस्य उपस्थित होते.

संसदेचं पावसाळी अधिवेशन गेल्या महिन्यात २० तारखेपासून सुरू झालं होतं. याच दरम्यान दिल्लीत झालेल्या विद्यार्थी आंदोलनावर पोलिस बळाचा वापर तसंच राम मंदिर देणगी अपहार प्रकरणी गृहमंत्री अमित शहा यांनी निवेदन द्यावं ही विरोधी पक्ष सदस्यांची मागणी यावरुन झालेल्या गदारोळामुळे कामकाजात वारंवार अडथळे आले. सभागृहाने २९ जुलै रोजी 'सार्वजनिक परीक्षा (अनुचित मार्गांचा प्रतिबंध) सुधारणा विधेयक' मंजूर केलं. याशिवाय 'राष्ट्रीय सन्मान अवमान प्रतिबंधक (सुधारणा) विधेयक', विनियोग विधेयक', 'न्यायाधिकरण सुधारणा विधेयक’, 'केरळचं  नाव बदलून केरळम करण्याचं विधेयक', 'राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (सुधारणा) विधेयक', 'बँकर्स बुक्स एविडन्स विधेयक, २०२६' आणि 'खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) सुधारणा विधेयक' यांचा समावेश आहे.

राज्यसभेचं कामकाजही अनिश्चित काळासाठी तहकूब करण्यात आलं. तत्पूर्वी, सकाळी ११ वाजता कामकाजाला सुरुवात झाली तेव्हा केंद्रीय कोळसा आणि खाण मंत्री जी. किशन रेड्डी यांनी खाणी आणि खनिजे (विकास आणि नियमन) सुधारणा विधेयक, २०२६' चर्चा आणि मंजुरीसाठी मांडलं. भारताच्या खाण क्षेत्राला अधिक कार्यक्षम आणि गुंतवणूक-पूरक बनवणं आणि देशाच्या महत्त्वाच्या खनिजांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी हे क्षेत्र सक्षम करणं हा या विधेयकाचा उद्देश आहे. हे विधेयक राज्यसभेत मंजूर झालं.

दरम्यान, संसदेच्या मकर द्वाराजवळ आज आंदोलन करत असताना राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडीचे सदस्य समोरासमोर आले आणि त्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. देशभरातील विद्यार्थी आंदोलनांवर चर्चा करण्यापासून काँग्रेस नेते राहुल गांधी पळ काढत असल्याचा आरोप करत, रालोआच्या खासदारांनी त्यांच्याकडून स्पष्टीकरणाची मागणी केली. सरकारला चर्चा करायची असचाना संसदेत विरोधकांनी चर्चेपासून पळ काढल्याचं संसदीय कार्यमंत्री रिजिजू यावेळी म्हणाले.

**होल्ड.. बाईट - किरेन रिजिजू**

तर, दुसरीकडे, २० जुलै रोजी दिल्लीत पेपरफुटीच्या विरोधात झालेल्या विद्यार्थी आंदोलनादरम्यान पोलिसांच्या कारवाईवरून केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी उत्तर द्यावं ही आपली मागणी इंडिया आघाडीच्या सदस्यांनी लावून धरली. यावेळी दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध घोषणा देण्यात आल्या.

**<><><><><>**

जुलै महिन्यात प्रवासी वाहनांच्या विक्रीत वार्षिक निकषावर ३४ पूर्णांक ३ टक्के वाढ होऊन ती ४ लाख ५७ हजार ८११ वर पोहोचल्याचं ‘सियाम’ या संघटनेनं जारी केलेल्या निवेदनात म्हटलं आहे. या काळात वाहन उद्योगाने जुलै महिन्यातली आतापर्यंतची सर्वाधिक विक्री नोंदवल्याचं यात म्हटलं आहे.

यंदाच्या जुलै महिन्यात गेल्या वर्षीच्या याच काळाच्या तुलनेत दुचाकी वाहनांची एकूण विक्री २२ पूर्णांक ६ दशांश टक्क्यांनी, तर तीन-चाकी वाहनांची विक्री ३३ पूर्णांक ४ दशांश टक्क्यांनी वाढली, असं यात म्हटलं आहे. ग्राहकांचा सकारत्मक कल राहिला, तर आगामी सणासुदीच्या काळात ही गती कायम राहील अशी आशा उद्योग संघटनेनं व्यक्त केली आहे.

**<><><><><>**

२०२४ २५ या वर्षातल्या कामगिरीसाठीचे संगीत नाटक अकादमी गौरववृत्ती आणि पुरस्कार आज नवी दिल्लीत राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. संगीत, नृत्य, नाटक, लोककला, आदिवासी कला, बाहुलीनाट्य आणि नाट्यविषयक इतर कला प्रकारांमधे भरीव योगदान देणाऱ्या ४० मान्यवरांना ३ लाख रुपयांची गौरववृत्ती प्रदान करण्यात आली. तसंच या क्षेत्रातल्या १०८ यशस्वी कलाकारांना प्रत्येकी एक लाख रुपयाचे संगीत नाटक अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आले. ताम्रपट, आणि शाल श्रीफळ देऊन राष्ट्रपतींनी त्यांचा सन्मान केला. हिंदुस्तानी संगीतातले ज्येष्ठ गायक अरुण कशाळकर, आनंद भाटे, मुकुंद मराठे, सनईवादक शैलेश भागवत, नृत्यांगना शुभदा वराडकर, मनीषा साठे, संगीतकार अशोक पत्की, अभिनेता अरुण नलावडे, दिग्दर्शक प्रमोद पवार यांचा त्यात समावेश आहे.

**<><><><><>**

जम्मू मध्ये वैष्णवदेवी इथं जाणाऱ्या पश्चिम भारतातल्या यात्रेकरूंच्या सोयीसाठी साबरमती- जम्मूतावी एक्स्प्रेसचा, ‘कटरा’ पर्यंत विस्तार करायला रेल्वे बोर्डाने मंजुरी दिली आहे. ही गाडी जम्मू मार्गे धावेल आणि कटरा इथं 'श्री माता वैष्णो देवी' रेल्वे स्थानकावर पोहोचण्यापूर्वी उधमपूरमध्ये 'शहीद कॅप्टन तुषार महाजन' स्थानकावर थांबा घेईल. या विस्तारित सेवेमुळे गुजरात, राजस्थान, पंजाब आणि पश्चिम भारताच्या इतर भागांमधल्या हजारो प्रवाशांना ‘जम्मू तावी’ इथून कटरापर्यंतच्या पुढल्या प्रवासासाठी वेगळी व्यवस्था करावी लागणार नाही, तसंच त्यांचा प्रवासाचा वेळ आणि अतिरिक्त खर्च कमी होईल, असं उत्तर रेल्वेच्या जम्मू विभागानं जारी केलेल्या प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

ही विस्तारित सेवा सुरु होण्याची तारीख याबाबतचा अंतिम निर्णय झाल्यावर जाहीर केली जाईल. त्यामुळे प्रवाशांनी आरक्षण आणि गाडीच्या सद्यस्थितीबाबत माहिती घेण्यासाठी IRCTC चं संकेतस्थळ, मोबाईल ॲप्लिकेशन किंवा रेल्वे स्थानकावर चौकशी खिडक्यांना भेट द्यावी असं यात म्हटलं आहे.

**<><><><><>**

मणिपूर मधे गेल्या २४ तासात सुरक्षा दल आणि पोलिसांनी राबवलेल्या मोहिमांमधे अनेक कट्टर अतिरेक्यांना अटक केली असून मोठ्या प्रमाणावर अमली पदार्थ, स्फोटकं आणि

इतर प्रतिबंधित साहित्य जप्त केलं आहे. खाबाम, लामखाई, सपाम, इरिलबुंग, चुराचांदपूर इत्यादी ठिकाणी ही कारवाई करण्यात आली.

<><><><><>

प्राप्तिकर विभागाने क्रीडा कोटा अंतर्गत ९७ खेळाडूंची नियुक्ती केली आहे. मुंबईत आयकर भवनात आयोजित कार्यक्रमात मुंबईचे प्रधान आयकर आयुक्त आलोक कुमार यांच्या हस्ते खेळाडूंना नियुक्ती पत्रं प्रदान करण्यात आली. रुजू होण्याच्या कार्यक्रमाचा एक भाग म्हणून, नव्याने भर्ती झालेल्या खेळाडूंना त्यांच्या भूमिका, जबाबदाऱ्या आणि लागू असलेल्या सरकारी नियमांची माहिती देण्यात आली.

<><><><><>

महाराष्ट्रात गडचिरोली जिल्ह्यात धानोरा तालुक्यात जपतलाई इथल्या अनुदानित आश्रमशाळेतल्या ३ विद्यार्थिनींचा सर्पदंशाने मृत्यू झाल्या प्रकरणी धानोरा पोलिसांनी शाळेचे मुख्याध्यापक आणि अधीक्षक यांना  काल रात्री अटक केली. कुपारलिंगो शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकास संशोधन संस्थेच्या या आश्रमशाळेत १० ऑगस्ट रोजी सर्पदंशामुळे ३ विद्यार्थिनींचा मृत्यू झाला, तर ३ विद्यार्थिनी आजारी पडल्या. यापैकी एक विद्यार्थिनी नागपूर इथं उपचार घेत आहे.

या घटनेच्या चौकशीनंतर धानोरा पोलिसांनी एकूण ५ जणांविरोधात गुन्हे दाखल केल्याचं स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी  सांगितलं.

<><><><><>

होर्मूझच्या समुद्रधुनीवर अमेरिकेचं पूर्ण नियंत्रण असून, धोरणात्मकदृष्ट्या महत्वाच्या असलेल्या या जलमार्गावर अमेरिका आपली पकड कायम ठेवणार असल्याचं अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी म्हटलं आहे. इराणची लष्करी आणि राजकीय व्यवस्था कमकुवत झाली असून, अमेरिकेच्या कारवायांना प्रभावीपणे प्रत्युत्तर देण्याची क्षमता इराणने गमावली आहे असा ट्रम्प यांचा दावा आहे. इराण गंभीर आर्थिक संकटाचा सामना करत असून, पूर्वीप्रमाणे प्रादेशिक प्रभाव पाडू शकत नाही, असं त्यांनी म्हटलं आहे. मात्र, इराणने अद्याप यावर कोणतीच प्रतिक्रिया दिली नाही.

<><><><><>

अमेरिकेच्या जडणघडणीत भारतीय नागरिकांच्या वाढत्या सहभागाची दखल घेत, भारताच्या समृद्ध वारशाचा गौरव करण्यासाठी, अमेरिकेतली अनेक राज्य १५ ऑगस्ट हा दिवस ‘भारत दिवस’ म्हणून साजरा करणार आहेत.

डेलावेअरचे गव्हर्नर मॅथ्यू मेयर यांनी नुकतीच याबाबतच्या आदेशावर स्वाक्षरी केली असून, १५ ऑगस्ट रोजी सर्व नागरिकांनी 'इंडिया डे' साजरा करावा, असं आवाहन केलं आहे. यापूर्वी न्यूयॉर्क, न्यू जर्सी आणि मॅसॅच्युसेट्स या राज्यांनीही असे आदेश जारी केले आहेत.

**//<><><><><>//**